No. of Printed Pages : 3

**QO2**

## विषय : मराठी ( अनिवार्य )

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** **एकूण गुण : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

(i) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

(ii) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

(iii) तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.

(iv) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(v) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

**1.** खाली दिलेल्या विषयावर सुमारे 600 ते 700 शब्दांचा निबंध लिहा. **40**

जागतिकीकरण: सत्य आणि आभास

**2.** खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. **15**

Wisdom and love, these are the two things which should be regarded as constituting the essential aspects of the Buddha's religion. He said that life is suffering and suffering has a cause and we can escape from suffering and we can attain nirvana or enlightenment. It is not something which is beyond our scope. It is possible for us to attain nirvana here and now. It is not essential for us to escape into another world. If we wish to become truly enlightened here and now by constant practice or deep meditation, it will be possible for us to attain enlightenment. When once we have that enlightenment, then we go out in to the world; we do not withdraw from the world but we participate in it. We get involved in it; all the time we are working for the uplift of humanity. If this temple suggests to us, inspires us with these ideals of self-knowledge and love of humanity it will have done a useful service. It is for that that we go to a temple.

[ Turn over

www.reliableacademy.com 9222335999

3. खाली दिलेल्या उताऱ्याचे १/३ शब्दांत सारांश लेखन करा आणि त्यास योग्य शीर्षक द्या. 20

(सूचना : विहित शब्दमर्यादेपेक्षा सारांशलेखन जास्त अथवा कमी झाल्यास योग्य ते गुण वजा करण्यात येतील.)

□ उतारा □

बुद्धिवादी मनुष्य निर्भय असतो. तो कोणाचे तुणतुणे वाजवीत बसणार नाही. तो आपल्या विशंकतेने पुढे पाऊल टाकील. जुने लोक कलियुग, कलियुग म्हणतात. नवीन लोक यंत्रयुग, यंत्रयुग म्हणतात. गांधी म्हणतील, ''मी माझे युग निर्माण करीन. मी चरख्याचे युग आणीन. ग्रामोद्योगाचे युग आणीन.'' बुद्धिमान मनुष्य री ओढीत बसणार नाही. तो स्वत:च्या विचारांचे युग आपल्या भोवती निर्माण करू पाहतो.

जगात स्वतंत्र बुद्धी फार थोडी असते. सनातनी लोक दहा हजार वर्षांपूर्वीच्या ऋषींचे गुलाम होतात, तर नवीन लोक पाश्चिमात्य पंडितांचे गुलाम होतात! परंतु भारतीय संस्कृती स्वतंत्र दिवा लावावयास सांगत आहे. तुमच्या देशाच्या स्थितीचा विचार करा, परंपरेचा विचार करा. आजूबाजूच्या देशांचाही विचार करा, आणि स्वत:च्या समाजाला काय हितकर ते बघा.

सत्याची तहान या सत्यकामाच्या भूमीत आज उत्पन्न झाली आहे की नाही? मानवजातीने जे जे उद्योग सुरु केले आहेत, जे जे विचार प्रांत उत्पन्न केले आहेत, त्या सर्व ठिकाणी आपण गेले पाहिजे. यंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्य, कला, रसायन, व्यायाम, क्रीडांगणे, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र या सर्व सत्याच्या साक्षात्कारांच्या क्षेत्रात न थकता, न दमता पुढे घुसणारे लोक भारतीय संस्कृतीच्या उपासकांत निर्माण झाले पाहिजे. प्रयोग केले पाहिजेत. हीच परमेश्वराची पूजा. देवाने दिलेले वाढविणे म्हणजेच त्याची पूजा. परमेश्वराने दिलेल्या बुद्धीचा विकास करणे म्हणजेच खरा धर्म.

त्या त्या काळातील प्रश्न त्या त्या विचारवंतांना सोडवावयाचे असतात. अर्वाचीन बुद्धीसमोर अर्वाचीन प्रश्न आहेत. भारतीय संस्कृतीत ही हिम्मत नाही का? जगातील राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा हक्क वेद घोकून मिळणार नाही, पूर्वजांची स्तुतिस्तोत्रे गाऊन मिळणार नाही. नवीन प्रश्नांस आपण हात घातला पाहिजे. प्रयोगालये म्हणजे होमशाळा काढल्या पाहिजेत. होऊ देत सुरु प्रयोग-सत्य-देवाचे सर्वांगीण स्वरूप समजून घेण्याचे प्रयोग.

आता कोठेही अडता कामा नये. आपले घोडे सर्वत्र दौडत जाऊ देत. ग्रामसंघटन, खादीशास्त्र, समाजशास्त्र, नवनीतिवाद, कोणतेही क्षेत्र असो, त्याविषयात आपण घुसू व नवीन ज्ञान निर्मू. ठिकठिकाणी संग्रहालये, प्रयोगालये, ग्रंथालये स्थापू. बौद्धिक व वैचारिक सहकार्य मिळवू. ज्ञान ही सहकार्याची वस्तू आहे. पूर्वीच्या शेकडो विचारांच्या खांद्यावर नवीन विचार उभा राहत असतो. गांधी टिळकांच्या कल्पनांचा विकास करतील. जवाहरलाल गांधींना पुढे नेतील. ज्ञानाच्या प्रत्येक प्रांतात अशी स्थिती आहे. तेथे अहंकार नाही, नम्र व निष्ठापूर्वक, ज्ञानेश्वराची पूजा आहे.

निर्मळ विचार व शुद्ध दृष्टी यांची आज नितांत आवश्यकता आहे. येथे अधीरता नको, उताविळी नको, स्वार्थ नको, आळस नको. निर्मळता हवी असेल तर खोल अभ्यासाची आवश्यकता आहे. प्रयत्न व कष्ट यांची जरूर आहे. समाजाबद्दल प्रेम व कळकळ यांची जरूर आहे. समाजाला सुखी कसे करता येईल, ही तळमळ लागली म्हणजे मग तुम्ही विचार करू लागाल. मग जो विचार स्फुरेल, त्याचा आचार सुरु होईल; आणि या विचाराला व आचाराला 'युगधर्म' असे नाव दिले जाईल.

www.reliableacademy.com 9222333999

4. आपल्या महाविद्यालयात संपन्न झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा तपशीलवार अहवाल आपणास कार्यक्रम प्रमुख म्हणून महाविद्यालयाच्या वार्षिकांकासाठी तयार करावयाचा आहे. हा अहवाल सुमारे दीडशे शब्दांपर्यंत असावा. **10**

सूचना : अहवालाच्या शेवटी कृपया आपले नाव लिहू नये.

5. खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या सूचनांबरहुकूम लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. **15**

(1) 'सद्‌गुण' या संधिवाचक शब्दाचा विग्रह करा.

(2) विध्यर्थी रूप करा–'विद्यार्थी गुरूजनांचा आदर बाळगतात'.

(3) 'ती बाग सुंदर आहे' हे वाक्य उद्‌गारवाचक करुन पुन्हा लिहा.

(4) 'नीरभत्सना' हा शब्द व्याकरणदृष्टया शुद्ध स्वरूपात लिहा.

(5) 'चक्रपाणी' या शब्दाचा समास ओळखा.

(6) पुढील वाक्य अचूक विरामचिन्हे घालून पुन्हा लिहा :

तो म्हणाला आज मी झेंडूची फुले हा कवितासंग्रह वाचला काय सुंदर कविता आहेत त्या

(7) 'औषध नलगे मजला' या वाक्याचा अलंकार ओळखा.

(8) पुढील काव्यपंक्तीतील रस ओळखा :

सुंदरी मूर्ति मदनाची, अमृतवदनाची, मदनकदनाची विखारी धार...

(9) ने, शी–नी, शी हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत?

(10) 'राम रावण मारतो' या वाक्याचे कर्मणी प्रयोगात रूपांतर करा.

(11) संधी करा :

मनु + अंतर

(12) संधी सोडवा :

महर्षि

(13) अधोरेखित शब्दाची जात ओळखा : सुरेश <u>बरोबर</u> रमेशही पक्षाच्या बाहेर पडला.

(14) पुढील नामाचे भाववाचक नाम करा :

नवल.

(15) पुढील अव्यय कोणते आहे?

परंतु.

-oOo-

www.reliableacademy.com 9222333999